# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.६०४ दिनांक २२/०७/२०२०

## स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट यांचेकडुन गांजा वाहतुक करणा-या आरोपीतास अटक करुन २ किला २५० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त

-------ooooo-------

दिनांक २१/०७/२०२० रोजी १९.५० वाजता वालीव पोलीस ठाणे हद्दीतील अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग चिंचोटी फाटया जवळ नायगाव पुर्व,ता.वसई जि.पालघर येथे आरोपीत १) मिथुन अशोक वर्मा वय ३१ वर्षे, रा. नायगाव पुर्व, ता.वसई, जि.पालघर. २) अविनाश बिजेश सिंग वय २६ वर्षे, रा. नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जि.पालघर यांनी त्याचे ताब्यातील सुजुकी कंपनीची बर्नमॅन स्कुटर वरुन २ किलो २५० ग्रॅम वजनाचा गांजा नावाचा अंमली पदार्थ बेकायदेशीर रित्या आपले कब्जात बाळगुन वाहतुक करीत असतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन १)३३,७५०/- रु.किंमतीचा उग्रवासाचा काळपट रंगाचा कॅनबीस या वनस्पतीचे शेंडे म्हणजेच गांजा नावाचा अंमली पदार्थ एकुण वजन २ किलो २५० ग्रॅम प्लास्टीक पिशवीसह किं.सु २)५०,०००/- रु किंमतीची ग्रे रंगाची सुजुकी कंपनीची बर्नमॅन स्कुटर असा एकुण ८३,७५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. II ६४८/२०२० एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यास दिनांक २१/०७/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र नाईक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.